महाराष्ट्र विधानपरिषद

दिवसाच्या कामकाजाचा क्रम

मंगळवार, दिनांक १९ जुलै, २०१६

(दुपारी १२.०० वाजता)

एक : नवनिर्वाचित सदस्याचा शपथविधी.

दोन : प्रश्नोत्तरे -

(क) तारांकित प्रश्न.

(ख) दिनांक १८ जुलै, २०१६ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

तीन : सर्वश्री.धनंजय मुंडे, नारायण राणे, सुनिल तटकरे, शरद रणपिसे, हेमंत टकले, माणिकराव ठाकरे, श्रीमती विद्या चव्हाण, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री. संदिप बाजोरिया, सतेज ऊर्फ बंटी पाटील, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री.संजय दत्त, अमरसिंह पंडित, जनार्दन चांदुरकर, जयवंतराव जाधव, श्रीमती हुस्नबानू खलिफे, सर्वश्री.अनिल भोसले, रामहरी रुपनवर, सतिश चव्हाण, रामराव वडकुते, नरेंद्र पाटील, प्रकाश गजभिये, ख्वाजा बेग, विक्रम काळे, जगन्नाथ शिंदे, अब्दुल्लाखान दुर्राणी, किरण पावसकर, आनंद ठाकूर, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. अनिल तटकरे, प्रभाकर घार्गे, जयदेव गायकवाड, अशोक ऊर्फ भाई जगताप, **वि.प.स. यांची म.वि.प.नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा -**

"राज्यातील महिला व अल्पवयीन मुलींवर वाढते अत्याचार, सामुहिक बलात्कार, विनयभंगाच्या वाढलेल्या घटना, बलात्कार करुन हत्या करण्याच्या घटनांमध्ये झालेली वाढ, कर्जत (जिल्हा अहमदनगर) तालुक्यातील कोपर्डी येथील नववीत शिकणाऱ्या तेरा वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर अमानुषपणे अत्याचार करुन व तिच्या शरिराची विटंबना करुन निर्घृणपणे हत्या करण्यात येणे, या घटनेनंतर तक्रार नोंदवून घेण्यास विलंब होणे, या अमानवीय घटनेमुळे छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, शाहु महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महाराष्ट्राची इभ्रत जगाच्या वेशिवर टांगण्यात येणे, राज्याच्या नावलौकिकाला काळीमा फासणाऱ्या या घटनेमुळे संपुर्ण राज्यात संतापाची लाट निर्माण होणे, राज्यात बंद, रास्ता रोको आंदोलनाद्वारे नागरिकांनी आपला रोष प्रकट करणे तसेच सामाजिक सलोखा व कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता निर्माण होणे, पिडीतेच्या कुटुंबास अद्यापही मदत न मिळणे, सर्व आरोपींना अटक करण्यात झालेली पोलीसांची दिरंगाई व त्यांना येत असलेले अपयश, राज्यात अनेक भागात विशेषत: पिंपरी, मुंबई, नागपूर इत्यादी अनेक ठिकाणी महिला व अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या घटना त्यामुळे संपुर्ण राज्यात निर्माण झालेला तीव्र संताप, पालकांमध्ये निर्माण झालेली दहशत व भितीचे वातावरण, महिला व अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेचा निर्माण झालेला प्रश्न, यावर गुन्हेगांरावर जरब बसवण्यासाठी शासनाने तातडीने

करावयाची कठोर कारवाई व शासनाची भूमिका."

चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — असल्यास.

- मध्यंतर -

पाच : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -

(१) **सर्वश्री. धनंजय मुंडे,** अमरसिंह पंडित, नरेंद्र पाटील, सतिश चव्हाण, अब्दुल्लाखान दुर्राणी, सुनिल तटकरे, हेमंत टकले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील कचरा व डंपिंग ग्राऊंडचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, शहरातील कचऱ्यांची विल्हेवाट लावल्या जाणाऱ्या डंपिंग ग्राऊंडची क्षमता संपत चालली असणे, मा.न्यायालयाच्या आदेशानंतर कांजूरमार्गच्या डंपिंग ग्राऊंडचा मार्ग खुला होणार असताना नवीन विकास आराखड्यात डंपिंग ग्राऊंडचे आरक्षण ठेवलेले नसणे, मुलुंड आणि कांजूरमार्ग येथे त्यावर निवासी आणि कमर्शियल बांधकामाचे आरक्षण ठेवल्याचे निदर्शनास येणे, मुलुंड व देवनारच्या डंपिंग ग्राऊंडवर कचरा टाकण्यास जागाच शिल्लक नसल्याने मुंबई महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या कंत्राटदारांना २५ वर्षांच्या कालावधीसाठी सवलतीच्या दरात पर्यायी जागा देण्याचा प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेने नगरविकास विभागाकडे दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास पाठविणे, राज्यातील ४० वर्ग (एक) शहरांमध्ये कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबतच्या प्रश्नाने अतिशय उग्र स्वरूप धारण केलेले असणे, डंपिंग ग्राऊंडचा प्रश्न सातत्याने भेडसावत असणे, मुंबईतील एकही भाग असा नाही की त्याठिकाणी नागरी वस्त्या नाही, त्यामुळे त्या त्या भागात डंपिंग ग्राऊंडला नागरिकांचा होत असलेला विरोध, त्याच पद्धतीने ठाणे, रायगड, पुणे, नागपूर व राज्याच्या इतर शहरी भागातही कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, सी.आर.झेड. च्या अधिनियमामुळे समुद्रकिनाऱ्यालगत डंपिंग ग्राऊंडचे प्रकल्प उभे करणे शक्य होत नसणे, तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी योग्य ती अनुमती दिली जात नसल्याने कचऱ्याच्या प्रश्नांची सोडवणूक होण्यास विविध अडचणी निर्माण होणे व त्यामुळे प्रदुषणात वाढ होऊन पर्यावरणाचा ऱ्हास होत असणे, तसेच डंपिंग ग्राऊंडच्या नजीकच्या परिसरातील रहिवाशांच्या आरोग्यावर होणा-या दुष्परिणामामुळे तेथील रहिवाशामंध्ये पसरत असलेला तीव्र असंतोष, त्यामुळे मुंबईतील कचऱ्याची विल्हेवाट लावल्या जाणा-या डंपिंग ग्राऊंडचा प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे,** सर्वश्री. अनिल भोसले, नरेंद्र पाटील, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री. संदिप बाजोरिया, धनंजय मुंडे, सतिश चव्हाण, अमरसिंह पंडित, सुनिल तटकरे, अब्दुल्लाखान दुर्राणी, संजय दत्त, किरण पावसकर, हेमंत टकले, ॲड. राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री. जनार्दन चांदूरकर, अशोक ऊर्फ भाई जगताप, आनंद ठाकूर, प्रकाश गजभिये, कपिल पाटील, ख्वाजा बेग, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दादर, मुंबई येथील आंबेडकर भवनाचे बांधकाम परिक्षण केल्यानंतर मुंबई महानगरपालिकेने या भवनाचा पश्चिमेकडील भाग कमकुवत झाल्याने सदरील भाग तोडण्याबाबत दिलेली नोटीस, सदरची नोटीस प्राप्त झाल्यानंतर या भवनातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची हस्तलिखिते, अन्य दस्तऐवज व त्यावेळच्या काही वस्तू या सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात न येणे, या इमारतीचे वीज, पाणी कनेक्शन तोडण्यात येणे, तसेच या वास्तूचा भाग मुंबई महानगरपालिका तसेच मुंबई पोलिस यांच्या उपस्थितीत तोडण्याची आवश्यकता असतांनाही ही वास्तू दिनांक २५ जून, २०१६ रोजी पहाटे द पीपल्स इंप्रुव्हमेंट ट्रस्टद्वारे एकाएकी पाडण्यात येणे, यामुळे या ऐतिहासिक वास्तूमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महत्वाच्या हस्तलिखितांची व अन्य वस्तूंची झालेली दुर्दशा, या प्रकरणी भोईवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येणे, आंबेडकर भवन पाडून त्या ठिकाणी १७ मजली टॉवर उभारण्याचा मंनसुबा असणे, आंबेडकर भवन पाडण्यात आल्याच्या निषेधार्थ आंबेडकर भवनपासून दादर टीटीपर्यंत आंबेडकरी अनुयायांनी काढलेला मोर्चा, या मोर्चाला हिंसक वळण लागून कार्यकर्त्यांनी आजुबाजुची दुकाने बंद न करणाऱ्या दुकानांची केलेली तोडफोड, सदरची इमारत पाडतांना नियमांचे उल्लंघन केल्याबाबत त्यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता, या प्रकरणी श्री.रत्नाकर गायकवाड यांना अटक करणेबाबत होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने केलेली व करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री. प्रशांत परिचारक, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील सोलापूर जिल्हयात असलेल्या पंढरपूर येथील महाराष्ट्राच्या आराध्य दैवताकडे प्रतिदिनी किमान १ लाख भाविक येत असूनही व मुळात पंढरपूरची लोकसंख्या १ लाख असताना या जिल्हयात पुरेशी आरोग्य सेवा उपलब्ध नसणे, पंढरपूरला असलेल्या कॉटेज रुग्णालयात मध्यंतरी २०० खाटांची घोषणा झाली असतानाच व

त्याबाबतचा शासन निर्णय निघाला असतानाही अद्याप त्यावर कार्यवाही न होणे, सदर रुग्णालयातील फीजिशिअन व ऑर्थो पेडिक डॉक्टरांची पदे दिर्घकाळ रिक्त असणे, या जिल्हयालगतच्या महामार्गावर ट्रॉमा सेंटर नसल्याने अपघात झाल्यास अपघातग्रस्तांना पुणे किंवा सोलापूरला पाठविल्याशिवाय पर्याय नसणे, या रुग्णालयातील डॉक्टरांना अधिक मानधन देऊन व कॉटेज रुग्णालयाचा दर्जा वाढवून तेथील रुग्णांना अधिक चांगली आरोग्यसेवा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, सोलापूर जिल्हयात इतर जिल्हा रुग्णालयांप्रमाणे आय बँकेची सुविधा निर्माण करण्याची आवश्यकता व पंढरपूर तीर्थक्षेत्री मोठया प्रमाणावर येणा-या भाविकांना चांगल्या प्रतीची व तात्काळ आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री.नारायण राणे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **पर्यटन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सिंधुदुर्गचा चेहरामोहरा बदलणा-या व स्थानिकांना मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध करुन देण्याची क्षमता असलेल्या जागतिक दर्जाच्या सी - वर्ल्ड प्रकल्पाच्या उभारणीसाठी १३९० एकरचा आराखडा कमी करुन हा प्रकल्प ३९० एकर जागेत वसविण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, असाच प्रकल्प शेजारील गोवा राज्यात उभारण्याचा प्रयत्न होत असून त्यासाठी केंद्र शासनाने गोव्यातील केपे येथे ९०० कोटींच्या अनुदानाला मंजूरी दिल्याची प्रसिध्द झालेली माहिती, सिंधुदुर्गमधील सी वर्ल्ड प्रकल्प उभारणीसाठी राज्य शासनाकडून गोवा राज्याच्या फायद्यासाठी दिरंगाई होत असल्याची सिंधुदुर्गवासियांमध्ये पसरलेली भावना, राज्यातील पर्यटनदृष्टया महत्वाचा प्रकल्प शेजारील राज्यात जात असल्याने व स्थानिकांचा रोजगार हिरावून घेतला जात असल्याने सर्वसामान्य जनतेत पसरलेली असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन राज्य शासनाचा सी-वर्ल्ड प्रकल्प इतर राज्यात जाऊ नये यासाठी व या प्रकल्पाच्या कामाला गती देण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

सहा : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).

सात : श्री. रामनाथ मोते, डॉ.नीलम गोऱ्हे, प्रा.अनिल सोले, ॲड.अनिल परब, सर्वश्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, गोपिकिशन बाजोरिया, नागो गाणार, रविंद्र फाटक, प्रविण दरेकर, सुजितसिंह ठाकूर, गिरीश व्यास, प्रशांत परिचारक, श्रीमती स्मिता वाघ, डॉ.अपूर्व हिरे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"राज्य शैक्षणिक क्षेत्रामध्ये अग्रेसर रहावे म्हणून शासनाने राबविलेल्या प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राचा कार्यक्रम व त्याला मिळणारे यश, ग्रामीण भागामध्ये विनामुल्य शिक्षण देणाऱ्या जिल्हा परिषद शाळा

प्रगत करण्यासाठी शासन करीत असलेले प्रयत्न, त्याकरिता भरविण्यात येणारी शैक्षणिक चर्चासत्रे, शिक्षकांचे प्रशिक्षण इत्यादीमुळे इंग्रजी माध्यमाच्या शाळा सोडून जिल्हा परिषद मराठी शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची वाढती संख्या, शासनाच्या चांगल्या शैक्षणिक धोरणांचा परिणाम म्हणून इ.१० वीच्या परिक्षेचा वाढता निकाल व त्यामुळे इयत्ता ११ वीच्या प्रवेशासाठी निर्माण झालेली वाढती चुरस, त्यांचाच परिणाम म्हणजे विद्यार्थी पालकांमध्ये असणारी अस्वस्थता व त्या अडचणीत भर म्हणजे प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक असणारा अधिवास दाखला, उत्पन्नाचा दाखला व जातीचा दाखला मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना तहसिलदार कार्यालयात मारावे लागणारे हेलपाटे, केंद्र शासनाच्या धोरणानुसार संबंधित दाखले विद्यार्थ्यांना शाळेत निकालासोबत देण्याची आवश्यकता, इयत्ता ११ वी व १२ वी ची फेरपरिक्षा घेवून विद्यार्थ्यांचे वाचलेले वर्ष, इयत्ता १० वी उत्तीर्ण न झालेल्या विद्यार्थ्यांना कौशल्य विकासासाठी प्रवेश देण्याबाबत घेतलेल्या निर्णयाने लाखो विद्यार्थी व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण असणे, परंतु त्याच वेळेस खाजगी संस्था चालक ऑफलाईन प्रवेश देऊन लाखो रुपयांचा गैरव्यवहार करित असल्याची बाब निदर्शनास येणे, अनुदानास पात्र ठरलेल्या शाळांना अनुदान देण्याची बाब तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, नवीन शाळा / महाविद्यालयांना मान्यता देण्याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, अभियांत्रिकी, व्यवस्थापन महाविद्यालयात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या जागा रिकाम्या असणे, नवीन विद्यापीठ कायदा त्वरीत अंमलात येणे या व इतर मागण्या तातडीने सोडविण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

आठ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) -

(१) श्री.विक्रम काळे, वि.प.स.

"टेंभुर्णी ते लातूर व तुळजापूर-लातूर-नांदेड या रस्त्यांच्या चौपदीकरणाबाबत" या विषयावरील **श्री. विक्रम काळे व इतर वि.प.स.** यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक **१८७४५** ला दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थिती करतील.

(२) प्रा.अनिल सोले, वि.प.स.

"चंद्रपूर जिल्हा परिषद कृषी विभागअंतर्गत शेतकऱ्यांना वाटप करण्यात आलेल्या लोखंडी बंड्या ह्या कमी वजनाच्या व निकृष्ठ दर्जाच्या असल्याबाबत" या विषयावरील **श्रीमती शोभाताई**

फडणवीस, माजी वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक **१११०३** ला दिनांक ११ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १८ जुलै, २०१६.

उत्तमसिंग चव्हाण,
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.